
# वन डे पिकनिक स्पॉट्स

भ्रमंती व लेखन : नंदकुमार टेणी



# वन-डे पिकनिक स्पॉट्स

भ्रमंती व लेखन
नंदकुमार टेणी

सातम उद्योग™
www.satamudyog.com

● आवृत्ती : २०२५

● भ्रमंती व लेखन : नंदकुमार टेणी

● प्रकाशक : हेमंत स. साटम

● मुद्रक : साटम उद्योग
२०३, अमित इंडस्ट्रियल इस्टेट, लालबाग, मुंबई-४०० ०१२.
८१६९९ ८४९२७

● फोटोग्राफी : मंदार देवधर

● मुखपृष्ठावरील प्रतिमा : सुनील फणसे, रिया फणसे, प्रणेश कोकाटे

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

# अनुक्रमणिका


गोराई बीच ........................ ६
वज्रेश्वरी ........................ ७
नॅशनल पार्क ........................ ८
शिळफाटा ........................ ९
किहिम ........................१०
अलिबाग ........................११
चौल-रेवदंडा ........................१२
काशीद आणि नांदगांव ........................१३
मुरुड-जंजिरा ........................१४
रायगड-रोप वे ........................१५
भंडारदरा ........................१६
बारवी डॅम ........................१७
महड-पाली ........................१८
शहाड-टिटवाळा ........................१९
झेनिथचा धबधबा ........................२०
बुशी डॅम ........................२१
माळशेज घाट ........................२२
पांडव लेणी-फाळके चित्रनगरी ...२३
मुक्तिधाम व सोमेश्वर ........................२४
डोंबिवली बीच ........................२५
कोंडेश्वर ........................२६
सप्तशृंग ........................२७
माथेरान ........................२८
डहाणू बीच ........................२९
वसई-अर्नाळा ........................३०
बोर्डीचा जादुई बीच ........................३१
जव्हार-कोपरा ........................३२
चिंचणी-सातपाटी ........................३३
शिवथरघळ ........................३४
आक्षी-नागाव बीच ........................३५
मुंब्रा देवी-मासुंदा तलाव ........................३६
कार्ला-एकवीरा ........................३७
तानसा, भातसा, वैतरणा ........................३८
माहुली गड ........................३९
पांडव कडा आणि
बेलापूरचा किल्ला ........................४०
कर्नाळा ........................४१
एलिफंटा-घारापुरी लेणी ........................४२
पानशेत ........................४३
त्र्यंबकेश्वर ........................४४
पिकनिक साँग्ज ........................४५
पिकनिक टिप्स् ........................४६

# भूमिका

'पिकनिक ईज रिचार्जिंग युवरसेल्फ' असे जे म्हणतात ते मुंबईसारख्या अत्यंत धावपळीच्या व तणातणीच्या वातावरणात आपले आयुष्य जगणाऱ्या मुंबईकरांच्या बाबतीत तर ते १००% खरे आहे. आपण रोज जगतो म्हणजे झोपेतून उठतो. दिनचर्या आटोपतो आणि सकाळी लवकर घराबाहेर पडतो. रात्री उशिरा घरी येतो. दोन घास खाऊन शक्य झालं तर थोडाफार टिव्ही बघून निद्राधीन होतो. या चक्रामध्ये आपण एवढे हरवून जातो की घरातल्या माणसांशी आपला मनमोकळा असा संवादही होत नाही. मग एक दिवस या सगळ्या रुटीनचा कंटाळा येतो आणि त्याची चौकट साफ भिरकाऊन द्यावीशी वाटते. काहीतरी वेगळे असे काही क्षण जगावेसे वाटू लागते. अशा वेळी मग आठवण येते ती पिकनिकची. कधी चेंज म्हणून तर कधी नुसती धमाल म्हणून, कधी सेलिब्रेशन म्हणून तर कधी सुटी आली म्हणून. पिकनिकला जावेसे वाटतेच पण येथेही नेहमीचे धावपळीचे आयुष्य आडवे येते. पिकनिकला जायचे कुठे ? तिथे पोहोचायचे कसे ? सोयी कशा आहेत ? केव्हा निघायला हवे ? केंव्हा पोहोचायला हवे ? तिथे नेमका प्रोग्राम कसा ठरवावा ? सोबत काय घ्यावे ? असे असंख्य प्रश्न मनात घोळू लागतात आणि त्यांची उत्तरे शोधू म्हणता म्हणता अनेकदा रविवारची दुपारही येऊन ठेपते आणि 'आता कसली पिकनिक आता नंतर केंव्हा तरी पाहू. आधी सगळी माहिती मिळवू, प्लॅनिंग करु आणि नंतर पाहू' अशी मनाची समजूत घातली जाते. तर तरुण पिढीच्या मनात कधीही पिकनिकचा मूड येतो. जवळ दुचाकी असेल तर पन्नास टक्के प्रश्न सुटलेले असतात. उरलेल्या प्रश्नांची उत्तरे हाती असतील तर वन-डे पिकनिक आणि शक्य नसेल तर हाफ-डे पिकनिकही काढायची त्यांची तयारी असते.

पिकनिक म्हणजे एखाद्या ठिकाणी मौजमजा करण्यासाठी जाणे व खाणे एवढेच नव्हे तर पिकनिक म्हणजे परस्परातील संवाद वाढवून भावनिक नात्याला उजाळा देणे त्याचा भावबंध अधिक दृढ करणे असा आहे. रोजच्या जीवनात आपण परस्परांशी हे झाले का ? ते केले का ? असे झाले ! तसे झाले ! एवढेच औपचारीक बोलतो परंतु मनसोक्त अशा गप्पा मारणे, हसणे, खेळणे तणावमुक्त वातावरणात काही क्षण जगणे यासाठी आपल्याला वावच नसतो. त्यातून आयुष्य एकसूरी होते. आयुष्यातला हा एकसूरीपणा घालविण्यासाठी व परस्परातील संवाद वाढविण्यासाठी पिकनिक आवश्यक असते. आपण अलिकडच्या काळात टिव्हीवर पाहिले आहे इराक युद्धाच्या काळातही अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश हे हिल स्टेशनवर विक-एन्डसाठी गेले होते. आपले पंतप्रधान वाजपेयी हे देखील हिमाचल प्रदेशात सुटी घालविण्यासाठी गेले होते. त्यांच्यासारख्या व्ही.व्ही.आय.पी. आणि बिझी नेत्यांना जर वेळ काढता येतो आणि वेगळ्या ठिकाणी विक-एन्ड किंवा सुटी घालवाविशी वाटते. मग तुम्हा आम्हा सारख्या सर्वसामान्यांना आठवड्यातून किंवा पंधरवड्यातून एखादी वन-डे पिकनिक काढायला काय हरकत आहे. पिकनिक एक दिवसाची असली तरी त्या दिवसामध्ये तुम्ही जे अनुभव घेता. आनंदाचे व सौख्याचे क्षण उपभोगता त्याच्या आठवणी तुमच्या स्मृतींच्या कोंदणात जडवल्या जातात. त्यातून गप्पांचे, संभाषणाचे नवे विषय आपल्याला लाभतात. अनेकदा आपल्यातल्याच किंवा आपल्या परिवारातील माणसांच्या स्वभावातल्या एखाद्या अनोख्या पैलूचे दर्शन आपल्याला होते. आणि ही वन-डे पिकनिक अविस्मरणीय होऊन जाते. अशा अनेक अविस्मरणीय पिकनिकचा आनंद सगळ्यांनाच लुटता यावा व तो सुलभतेने एन्जॉय करता यावा यासाठी या लेखनाचा हा प्रपंच. तो कितपत यशस्वी झाला याचा कौल मात्र वाचकांनी म्हणजे आपण द्यायचा आहे.